तात्काळ

# महाराष्ट्र शासन

क्रमांक:व्हीपीएम-२००१/प्र.क्र.१६०४/२२,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: ४ ऑगस्ट, २००१

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सोलापूर.

विषय:- जिल्हा ग्राम विकास निधी मुदत ठेवीतील रकमा काढुन ठेकेदारांची बीले अदा करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

संदर्भ:- आपले जा.क्र. जीपसो/ पापुवि-२/मुलकी-१/ २३४, दिनांक २५ जुलै, २००१

उपरोक्त विषयावरील आपले संदर्भीत पत्र कृपया पहावे. जिल्हा ग्राम विकास निधीमधुन कोणत्या बाबींसाठी कर्ज देता येईल अथवा कोणत्या बाबींसाठी खर्च करता येईल, याबाबत मुंबई जिल्हा ग्राम विकास निधी, नियम १९६० मध्ये स्पष्ट तरतुदी आहेत. त्याप्रमाणे सदर निधीचा खालील कारणांसाठी उपयोग करता येईल.

१) ग्राम पंचायतींना कर्ज देण्यासाठी,

२) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ४५ मध्ये निर्दीष्ट केलेल्या कारणांबाबतीतील अधिकार व कर्तव्य पंचायतींना पार पाडता यावे म्हणुन कर्ज देता येईल.

---२---

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, जळगांव

C:\My Documents\SS SHAIKHCR-1604-22-S8 page no.

RR No-385
31/8/2001

Scanned with OKEN Scanner

३) आयुक्तांचे परवानगीने स्थायी समितीस निधीच्या कामासाठी नेमलेला सेवक वर्ग आणि त्यासाठी अनुषंगीक अशा सर्व बाबीसाठी खर्च करता येईल.

२. अधिनियमातील तरतुदी स्पष्ट असल्यामुळे जिल्हा ग्राम विकास निधीतून ठेकेदारांची बीले अदा करण्यासाठी शासनाकडून अनुदान प्राप्त होईपर्यन्त जिल्हा ग्रामीण विकास निधी मुदत ठेवीतील रकमेमधुन ठेकेदारांची बीले अदा करता येणार नाहीत. याची नोंद घ्यावी व स्थायी समितीच्या निदर्शनासही ही बाब असावी.

या पत्राच्या प्रती माहिती व मार्गदर्शनार्थ सर्व जिल्हा परिषदांकडे पाठविण्यात येत आहेत.

(कुंदा गोसावी)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व) यांजकडे माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.



Scanned with OKEN Scanner